नगर परिषद/नगर पंचायतींची प्रभाग रचना करण्याकरिता लोकसंख्येचे वितरण निश्चित करणेबाबत

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७(२)/का-६,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २४/०७/२०१५.

## आदेश

ज्याअर्थी,-

(i) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे,

(ii) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १० नुसार नगरपरिषदेच्या क्षेत्राचे प्रभागात विभाजन करणे आणि आरक्षण करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाचे आहेत.

(iii) नागरी क्षेत्राची निवडणूक प्रभागामध्ये विभागणी करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा/२००५/प्र.क्र.१७/का-५, दिनांक ३ मे, २००५ असून या आदेशांच्या परिच्छेद १२ नुसार प्रभाग रचना लोकसंख्येवर आधारित असते. भारतीय संविधानातील प्रकरण क्र. ९अ (नगरपालिका) यामध्ये दिलेल्या लोकसंख्येच्या व्याख्येनुसार लोकसंख्या म्हणजे संबंधित आकडेवारी प्रसिध्द करण्यात आली आहे अशा लगतपूर्वी झालेल्या जनगणनेवर निर्धारित लोकसंख्या, यामुळे प्रभाग रचना करताना जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध करून घेतलेल्या लोकसंख्येचा तपशील (जनगणना प्रभागनिहाय व प्रगणक गटनिहाय) विचारात घेण्यात यावा" अशी तरतूद आहे.

मोरा/प्रच १०५६(3)(५५०-७-२०१५).

(iv) जनगणना कार्यालयामार्फत जनगणना करताना बऱ्याचशा ग्रामीण भागामध्ये प्रगणक गट केलेले नसतात किंवा ग्रामीण भागाकरिता प्रगणक गटनिहाय लोकसंख्या प्रसिध्द केली जात नाही.

आणि ज्याअर्थी, --

(i) जनतेची मागणी लक्षात घेऊन शासन वेळोवेळी राज्यामध्ये नवीन नगर परिषद/नगर पंचायत स्थापण्याचा निर्णय घेते.

(ii) नव्याने स्थापन झालेल्या बहुतांश नगरपरिषदा / नगरपंचायती यांचे क्षेत्र २०११ च्या जनगणनेच्या वेळी ग्रामीण क्षेत्र होते. म्हणून नव्याने निर्माण झालेल्या बऱ्याचशा नगर परिषद/नगरपंचायत क्षेत्राची प्रगणक गटनिहाय लोकसंख्या, जनगणना कार्यालयाकडून उपलब्ध होत नाही. तसेच काही नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रामध्ये प्रगणक गटांची संख्या करावयाच्या प्रभागांपेक्षा कमी असल्याने प्रगणक गट फोडणे आवश्यक असते. तसेच बऱ्याचशा नगर परिषद क्षेत्रामध्ये असलेल्या लोकसंख्येचे वितरण असमान असते. त्यामुळे प्रभाग शक्यतो समान लोकसंख्येचे करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक आहे. या सर्व बाबी ध्यानी घेता नगरपरिषद / नगरपंचायतींच्या क्षेत्राची प्रभाग रचना करण्याकरिता संबंधित नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्राचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करून २०११ च्या जनगणनेच्यावेळी असलेली लोकसंख्या संबंधित क्षेत्रात कशाप्रकारे वितरित झाली आहे हे निश्चित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, -

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १० (ओ)(४) नुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयुक्त खालीलप्रमाणे आदेश देत आहेत:-

## आ दे श

(i) प्रभाग रचना करण्याकरिता जनगणना कार्यालयाशी संपर्क साधून त्यांचेकडून नगर परिषद/नगर पंचायत क्षेत्रातील प्रगणक गटाचे नकाशे आणि प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या प्राप्त करून घ्यावी.

(ii) ज्या नगर परिषद/नगर पंचायतींच्या बाबतीत अशी माहिती प्राप्त नाही, त्यांचे बाबतीत माहिती उपलब्ध होऊ शकत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र संचालक, जनगणना यांचेकडून घेण्यात यावे.

(iii) ज्या ठिकाणी प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गटाची एकूण लोकसंख्या, अनुसूचित जातीची व अनुसूचित जमातीची लोकसंख्या उपलब्ध नाही किंवा प्रभाग रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक आहे त्या प्रकरणी सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्वेक्षण करून संबंधित क्षेत्रात लोकसंख्या कशाप्रकारे वितरित झाली आहे हे निश्चित करावे. सर्वेक्षण करताना जनगणना ज्यावेळी झाली त्यावेळी म्हणजे २०११ मध्ये लोकसंख्येचे वितरण कसे होते हे जाणून घ्यावयाचे असल्याने सर्वेक्षण करताना २०११ मध्ये जनगणनेच्या वेळी संबंधित व्यक्ती दिलेल्या पत्त्यावर रहात होती किंवा कसे, संबंधित इमारत कधी बांधण्यात आली, २०११ च्या जनगणनेनंतर झालेले जन्म / मृत्यु इत्यादी बाबी लक्षात घ्याव्यात.

(iv) प्रभाग रचना करताना राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का-५, दिनांक ३ मे, २००५ नुसार विहित केलेल्या मार्गदर्शक पध्दतीनुसार प्रभाग रचना करावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति,

१) सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
३) विभागीय आयुक्त (सर्व)
४) जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
५) सर्व नगर परिषदांचे /नगर पंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी
६) निवड नस्ती

परिशिष्ट

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७(२)/का-६, दिनांक २४/७/२०१५)

...............................नगर परिषद/नगर पंचायती यांचे बाबतीत प्रभाग रचना करण्याकरिता २०११ च्या जनगणनेचे प्रगणक गटाचे नकाशे किंवा त्यासंबंधीची प्रगणक गटनिहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या इत्यादी माहिती प्राप्त झाली नाही किंवा प्रभागाची रचना करण्याकरिता प्रगणक गट फोडणे आवश्यक आहे अशा प्रकरणी निवडणुकीकरिता २०११ च्या जनगणनेच्यावेळी असलेली लोकसंख्या संबंधित क्षेत्रात कशा प्रकारे वितरीत झाली आहे हे निश्चित केली आहे त्याचा तपशील.

सर्वेक्षण केल्याची तारीख :-

| अ.क्र. | जनगणना घर क्रमांक | कुटुंब प्रमुखाचे नांव | १/१/२०११ ची लोकसंख्या | अनुसूचित जाती (असल्यास) लोकसंख्या | अनुसूचित जमाती (असल्यास) लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| एकूण... | | | | | |

सर्वेक्षणानुसार एकूण लोकसंख्या ...............................

अनुसूचित जातीची एकूण लोकसंख्या...............................

अनुसूचित जमातीची एकूण लोकसंख्या...............................

मुख्याधिकारी,

नगर परिषद/नगर पंचायती

जिल्हाधिकारी